यशवंत लातूर रविवार दिनांक २५ सप्टेंबर २०२२

# तणावमुक्त जीवनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास - प्रल्हाद बाहेती



देवणी (प्रतिनिधी) हसत खेळत आनंदी जीवन जगणे ही एक जगण्याची कला असून तणाव मुक्त जीवन जगण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी अवगत केले तर त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो असे प्रतिपादन निलंग येथील सुप्रसिद्ध उद्योजक प्रल्हाद बाहेती यांनी केले. कै. रसिका महाविद्यालय देवणी येथे विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित बी.कॉम., बी.एससी. प्रथम वर्षाच्या स्वागत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव व जबाबदारीचे भान ठेवून वर्तन केले पाहिजे, जीवनात सतत संघर्ष केला पाहिजे व चांगले मित्र बनवले पाहिजे यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो. असे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव गजाननजी भोपणीकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत जावळे यांनी केले. उपस्थित सर्व पत्रकारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. बी. कॉम., बी.एससी. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे यावेळी पुष्पगुच्छ देऊन द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता कोनाळे व श्रद्धा बिरादार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमनी यांनी केले. आभार प्रदर्शन अंजली स्वामी या विद्यार्थिनीने केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के डॉ. रेणुका कुनाळे, साहिल चिद्रेवार यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

(Gopal)
कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

(signature)
Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur

देशोन्नती

# गोविंदराव भोपणीकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** — येथील कै. रसिका महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांचा ६३ वा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी भव्य रक्तदान शिबिर व वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन रामराव बिरादार भोपणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्था सचिव गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गोपाल सोमाणी यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी गोविंदराव भोपणीकर यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर वाढदिवसानिमित्त गोविंदराव भोपणीकर यांचा भव्य सत्कार करून केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी रेणुका पतंगे यांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी संस्था सचिव गजानन भोपणीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, आबासाहेब इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सुप्रिया कांबळे, तालुका कृषी अधिकारी एस. आर. पाटील, सहायक कृषी अधिक्षक डी. जे. मोरे, कृषी सहाय्यक एस. व्ही. धनेगावे, बी. एन. अंकुलवार, परभणी येथील बी. रघुनाथ महाविद्यालयाचे संस्थाचालक ओमप्रकाश दागा, डॉ. नागोराव पाडोदे, लासोना येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुभाष माने, माजी चेअरमन मुरहारी माने, बालाजी माने, सोपान हुलसुरे, सरपंच धनराज मठपती, उपसरपंच अंकुश माने, रोहित माने, देवणी खुर्द येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन रतनराव गरड, व्हाइस चेअरमन माधव पाटे, सचिव मुरहरी शिवणखेडे, दत्ता पाटील, प्रितम अस्टूरे, गणेश फावडे, रामराव बिरादार, मालबा धोणसे, बालाजी टाळीकोटे, गिरीश गायकवाड, मधुकरराव लांडगे, गजानन लांडगे, आरोही भोपणीकर, अनवी भोपणीकर यांच्यासह आबासाहेब इंग्लिश स्कूल व कै. रसिका महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व देवणी व परिसरातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले आभार मंटोळे प्रियंका यांनी मानले.

## मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले वृक्षारोपण



कै. रसिका महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांचा ६३ वा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी भव्य रक्तदान शिबिर व वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन रामराव बिरादार भोपणीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरुवार, दि. २९ सप्टेंबर २०२२

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist, Latur

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

देशोन्नती

# रसिका महाविद्यालयात मतदार ओळखपत्र-आधार कार्ड जोडणी कार्यशाळा संपन्न



कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur